माहितीचा अधिकार

ISO 9001:2008 Certification
प्राप्त महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८
क्र.नासुके/१/कावि/ ३७ /२०१७
दिनांक १२ /०४/२०१७

**विषय :- माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती अर्ज व अपील अर्ज स्विकारणेबाबत...**

परिपत्रक

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये अपिलार्थी श्री.नितीन शशिकांत यादव यांनी व्दितीय अपील सादर केले आहे. त्यास अनुसरुन दि.२८/११/२०१६ रोजी झालेल्या अपिलाच्या सुनावणीच्या वेळीचा युक्तीवाद व प्रकरणातील कागदपत्रे विचारात घेता, प्रस्तूत प्रकरणांत मा.राज्य माहिती आयुक्त, श्री. रवींद्र जाधव यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती अर्ज / प्रथम अपील अर्ज अपूर्ण पदनाम इ. कारणास्तव न नाकारता ते स्विकारुन आवश्यकतेनुसार योग्य त्या अधिकाऱ्याकडे विहित मुदतीत वर्ग करणेबाबत दक्षता घेण्याचे निर्देश पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिलेले आहेत. सोबत सदर आदेशाची प्रत जोडणेत येत आहे.

सबब या परिपत्रकान्वये सर्व विभागप्रमुख तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना सूचित करण्यात येत आहे कि, माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती अर्ज / प्रथम अपील अर्ज अपूर्ण पदनाम इ. कारणास्तव न नाकारता ते स्विकारुन आवश्यकतेनुसार योग्य त्या अधिकाऱ्याकडे विहित मुदतीत वर्ग करणेबाबत दक्षता घ्यावी.

तसेच, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. भविष्यात अधिनियमांतील नियमांचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करणेत येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(दिनेश वाघमारे)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रति,

सर्व विभागप्रमुख / शाखाप्रमुख
-------------------- विभाग.
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

२/- प्रस्तुतचे परिपत्रक आपल्या नियंत्रणाखालील संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचे निदर्शनास आणून द्यावे.

सोबत :- आदेश पारित दि.२८/११/२०१६ ची प्रत...

)

## मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये प्राप्त अपील.

अपिल क्रमांक :-८२७/२०१५/पुणे
राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवनासमोर,पुणे-४११००१

१) श्री.नितीन शशिकांत यादव, : अपिलार्थी
प्लॅट क्र.1, चंदन सो, तानाजीनगर, चिंचवड, पुणे 33

विरुध्द

२) जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी : उत्तरवादी
(पर्यावरण विभाग),पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-411 018

३) प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त, :
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-411 018

आयुक्त कार्यालय
आवक क्र.-१००१
दिनांक-३०।१।१७
विभाग- पर्यावरण/CFC
टेबल क्र.-
मा. आयुक्त-

**आदेश पारित दि.२९/११/२०१६**

अपिलार्थी यांनी दि.१०/३/२०१५ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर प्रकरणी दि.२८/११/२०१६ रोजीच्या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी असे सांगितले की, माझा माहिती अर्ज दि.१३/११/२०१४ रोजीचा असून त्यामध्ये मनपा अंतर्गत मैला शुध्दिकरण प्रकल्प साफसफाई, देखभाल दुरुस्ती, ठेकेदारांची नावे, संपर्क क्रमांक इ. तसेच, दि.८/११/२०१४ रोजी पार्क स्ट्रीट हौसिंग सोसायटीत मृत्युमुखी पडलेल्या कामगारांच्या अनुषंगाने माहिती मागितली होती. दि.१३/११/२०१४ च्या पत्रान्वये मला मुद्दा क्र.१,२ व ३ ची माहिती पुरविली व मुद्दा क्र.४,५ व ६ बाबत क व ड क्षेत्रिय कार्यालयाकडे वर्ग केलेचे कळविले. दि.९/१२/२०१४ अन्वये रुपये ६६/- शुल्क भरण्यास कळविले. मी दि.१५/१२/२०१४ शुल्क भरल्यानंतर मला त्याच दिवशी माहिती पुरविली. मी ठेकेदारांची माहिती मागितली होती, त्याऐवजी ठेका किती रकमेचा दिला इ. माहिती पुरविली. मला सविस्तर माहिती पुरविली. मला फक्त ठेकेदारांचे नांव व फोननंबर हवे होते. मुद्दा क्र.४,५,६ महाराष्ट्र प्रदूषण मंडळाकडून मिळेल असे सांगितले. मंडळाने PCMC कडून घ्यायला कळविले. मला

माहिती देण्यात टोलवाटोलवी केली. प्रथम अपिलीय अधिकारी, पर्यावरण यांनी प्रथम अपिल स्विकारले नाही, Refused अशा पोस्टाच्या शे-यासह पाकीट परत आले. केवळ NOC देऊन मनपा ची जबाबदारी संपत नाही. संबंधितांवर शास्ती लावावी.

सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, प्रथम अपील अर्जावर अपिलीय अधिकारी, पर्यावरण विभाग एवढाच पत्ता नमूद होता. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी दि.९/१२/२०१४ च्या पत्रात प्रथम अपिलीय अधिकारी श्री. अंबादास चव्हाण, सहशहर अभियंता (जलनि:स्सारण) PCMC असे प्रथम अपिलीय अधिकारी यांचे नांव पदनाम कळविले होते. शुल्क भरल्यानंतर मुद्दा क्र.१,२ व ३ ची माहिती पुरविली. अपिलार्थीने ठेकेदारांची नावे व पत्ता इ. माहिती मागितली होती. STP केंद्र निहाय वर्क ऑर्डर च्या प्रती पुरविल्या. त्यामध्ये ठेकेदारांचा पूर्ण पत्ता नमूद आहे.सर्व संबंधित वर्क ऑर्डरच्या प्रती पुरविल्या व वर्क डीस्ट्रीब्युशनच्या (कामकाज वाटपाच्या) कार्यालयीन आदेशाच्या प्रती पुरविल्या असून त्यामध्ये अधिका-याचे नांव, पदनाम व नेमून दिलेले काम इ. माहिती नमूद आहे. अपघात झालेला एस.टी.पी. हा खाजगी सोसोयटीतील होता. त्यावर प्रदुषण नियंत्रण विभागाचे नियंत्रण असते. महानगरपालिकेच्या ड्रेनेज विभागाने चौकशी करुन केलेल्या अहवालाची प्रत अर्जदारास दिली आहे.

सुनावणीच्या वेळीचा युक्तीवाद व प्रकरणातील कागदपत्रे विचारात घेता, प्रस्तूत प्रकरणांत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश.

(१) आयुक्त, पिंपरी चिंचवड, महानगरपालिका, पिंपरी यांना सूचित करण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व विभागातील जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना माहिती अर्ज / प्रथम अपिल अर्ज अपूर्ण पदनाम इ. कारणास्तव न नाकारता ते स्विकारुन आवश्यकतेनुसार योग्य त्या अधिका-याकडे विहित मुदतीत वर्ग करण्याबाबत दक्षता घेण्याचे निर्देश द्यावेत.

(२) वरिल निर्देशांसह अपील क्र.८२७/२०१५/पुणे निकाली काढण्यात येत आहे.

(रवींद्र जाधव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

प्रत, श्री दिनेश वाघमारे.
आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालीका, पिंपरी, पुणे - १८